2018-19

डॉ. वाल्हे


| | | |
|---|---|---|
| 31 | सवाल्टन इतिहासलेखन : एक अभ्यास — डॉ.संतोष वाडेकर | 130 |
| 32 | हाडोळती ग्रामवस्तीतील कृषी उत्पादनावर हवामान बदलाचा झालेला परिणाम अभ्यासणे — डॉ. अंबादास मुळे | 135 |
| 33 | कवी गोविंदसुतांचे 'सूर्यतीर्थ' एक अवलोकन — डॉ. सुरेश खोब्रागडे | 138 |
| 34 | संगीत आणि संपादन प्रेरणा या घटकांचा आक्रमकतेवर होणारा परिणाम — डॉ. गजानन रत्नापारखी | 142 |
| 35 | 'छावणी' कादंबरी एक अभ्यास — डॉ.संगीता शेळके | 151 |
| 36 | संत सेवादासाचे क्रांतिकारी विचार [बोल] — कु.मनाली राठोड | 154 |
| 37 | संत तुकारामांच्या कवितेतील कृषी जाणिवांचे संदर्भ — प्रा.बाळासाहेब कटारे | 157 |
| 38 | विद्याधर गोखले यांचे कथाविश्व — विद्या कडे | 161 |
| 39 | चरित्र वाङ्मयप्रकार संकल्पना, स्वरूप व वैशिष्टये — श्री. दत्तात्रय आसवले, डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | 164 |
| 40 | भक्ती संप्रदायातील स्त्री — डॉ.अशोक लिंबेकर | 169 |
| 41 | आठवणीचे पक्षी स्वरूप व समीक्षा — प्रा.सिद्धार्थ इंगोले | 171 |
| 42 | आघाड्यांच्या सरकारचे [सन १९९९ते २०१४] महाराष्ट्र राज्य — डॉ. के.जी. पोकळे | 175 |
| 43 | महात्मा गांधी यांची रामराज्याची संकल्पना — डॉ. डी.एम. चौधरी | 180 |
| 44 | स्त्री अस्तित्वाचा आत्मशोध स्त्रीवादी दृष्टीकोनातून — प्रा.प्रापी जोशी | 184 |
| 45 | शारीरिक शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास — डॉ. नासिर शिरासे | 191 |
| 46 | सांकृतिक पर्यावर आणि मराठी कविता — डॉ. सुनिल निगडे | 193 |
| 47 | मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमधून अवतरले ग्रामीण जीवनदर्शन — सौ. भाग्यश्री लेंडे | 199 |
| 48 | लोकशाही व्यवस्थेतील राजकीय सामाजीकरणामध्ये राजकीय पक्षांची भूमिका:एक अभ्यास — प्रा.पेटावार | 203 |
| 49 | मराठवाडा मुक्तीसग्रमातील जंगल सत्याग्रह व वर्हाड प्रांताचे योगदान — डॉ. धीरजकुमार नवान | 210 |
| 50 | अधुंची झाली फुले या नाटकातील आशय – अभिव्यक्ती — डॉ. भूषण बंड | 216 |
| 51 | राष्ट्रसंताचे वैवाहिक जीवनाविषयी विचार — डॉ.प्रवीण करंजकर | 219 |
| | भाषांतर क्षेत्रातील व्यावसायिक संधी — डॉ. भच्छिंद्र काळे | 222 |
| 52 | थेरीगाथेतील अनुपम सौंदर्य –एक चर्चा — डॉ.माधवी खरात | 225 |
| 53 | ताणतणावाबाबत सद्यस्थिती व प्रतिबंधक उपाययोजना — डॉ. मनीषा मुलकलवार, डॉ.प्रमोद मुलकलवार | 230 |
| 54 | योगनिद्रेची शास्त्रीय बैठक व प्रत्यक्ष तंत्र — डॉ.सुभाष बाघ | 236 |
| 55 | ज्ञानेश्वरीतील अथवा अंकुर विषयक संदर्भाचे प्रयोजन :एक अभ्यास — डॉ.राजीव यशवंते | 239 |
| 56 | मानवी हक्क आणि भारतातील युवक कल्याण योजना — डॉ.सतीश देसाई | 243 |
| 57 | जयप्रकाश नारायण यांच्या समाजवादी विचारांचा एक विश्लेषणात्मक आभ्यास — डॉ. संभाजी पाटील | 248 |
| 58 | वारकरी संप्रदायातील संत कवयित्रिंचे भक्तीकाव्य — डॉ.अनिल गर्जे | 255 |
| 59 | समीक्षक वा.ल.कुलकर्णी यांची सैद्धांतिक कथा समीक्षा — डॉ. कैलास महाले | 262 |
| 60 | महिला आयोगाची महिलांच्या हक्कांच्या संरक्षणातील भूमिका — डॉ.दिलीपसिंह निकुंभ | 268 |
| 61 | आंबेकर घराण्याचे सामाजिक आणि संस्कृतीक योगदान — अपर्णा गुरव | 273 |
| 62 | विनोबा भावे आणि सर्वोदय — डॉ.संभाजी पाटील | 276 |

दूरध्वनी : ९४८९४३८७२
ईमेल: datanawale@gmail.com

**डॉ.ज्ञानेश्वर नाईकडे**
बी.टी.वाघे महाविद्यालय,पोंडेगाव,ता.आंबेगाव,जि.पुणे

**प्रास्ताविक:–**

मराठी साहित्यामध्ये कथा,कविता,कादंबरी,नाटक,आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारांतर्गत चरित्र हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानला गेला आहे. चरित्र हा वस्तुनिष्ठ लेखनाचा प्रकार आहे. चरित्रलेखनाची परंपरा प्राचीन असून आधुनिक वाङ्मयापर्यंत विविध क्षेत्रातील व्यक्ती,संत,महापुरुष,स्त्रिया यांच्या जीवनावरील चरित्रे लिहिलेली आढळतात.

मराठीमध्ये एकूण व्यक्तिचरित्र अनेक चरित्रकारांनी चरित्रे लिहिली आहेत.प्रत्येक चरित्रकाराची भूमिका वेगवेगळी आहे.प्रत्येकाचा चरित्रनायकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न आहे. एकमेव साची या लेखनशैलीच्या दृष्टिनेही त्यामध्ये वैशिष्ट्येपणा आलेले.चरित्रवाङ्मयाचे महत्त्व हेतू वाङ्मयप्रकारलक्षणांमध्ये अनन्यसाधारण आहे.थोर स्त्रीपुरुषांनी चरित्रे ही समाजाला दिशा देणारी व मार्गदर्शक ठरत असतात.त्यामुळेच अलिकडे चरित्रलेखनाकडे व वाचनकडेही कल वाढू लागला आहे म्हणून स्वतंत्र सामर्थ्य असलेल्या आणि समाजास प्रेरणा देणाऱ्या चरित्रवाङ्मयाचा स्वतंत्रपणे वेगळेच अभ्यास होणे आवश्यक आहे.

या सर्व गोष्टी लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणांमधून चरित्रवाङ्मयकाराची संकल्पना,स्वरूप व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे मांडता येईल.

**चरित्र संकल्पना:–**

चरित्र ही एक स्वतंत्र संज्ञा आहे.तिचे मराठी शब्दकोशात वेगवेगळे अर्थ सांगितले आहेत. चरित्र म्हणजे आचरण, स्वभाव,पालन करणे, वर्तन, स्वभाव, वर्तन,कर्तव्य,सत्यासत्य आणि इतिहास इ.वेगवेगळे अर्थ चरित्राचे सांगितले जातात इंग्रजीमध्ये चरित्र या शब्दासाठी दृश्यवाहनयोग्य असा शब्द वापरला जातो. चरित्राचे वेगवेगळे अर्थ सांगितले गेले असले तरी सदा कऱ्हाडे यांनी चरित्र संकल्पना अधिक स्पष्ट मांडली आहे.''चरित्र अथवा चरित्र हे शब्द संस्कृतभाषेतील चर या धातूपासून सिध्द झालेले आहेत. या धातूचे जे अनेक अर्थ आहे त्यात करणे (To do),सिध्दीस नेणे (To perform),कृती करणे(To Act), वर्तणे(behave) हे अर्थ महत्त्वाचे आहेत.चरित्र या शब्दाचा अर्थही आचरलेले (Acted behaved) असा आहे.आणि चरित्र या शब्दाचाही अर्थ चालत्याबोलत्या व्यक्तिचा वागण्याची तऱ्हा (Behaviour), वर्तन (conduct), संपादणूक (performance) असे आहे.याचाच त्यामुळेच आपण व्यक्तिचरित्र म्हणजे व्यक्तिची परिस्थितिसापेक्ष अथवा विशेष कृतिउक्ती.''

सदा कऱ्हाडे यांच्या विवेचनावरून असे लक्षात येते की, व्यक्तिची कृतिउक्ती व त्यातून विशिष्ट काळसंदर्भात सिध्द होणारे त्याचे जीवनकर्तृत्व व त्यातून प्रकाश होणारे त्याचे व्यक्तिमत्त्व एवढ्या मोठ्या 'चरित्र' या संकल्पनेत अभिप्रेत आहेत. एकूणच काय तर प्रत्यक्षात होऊन गेलेल्या व्यक्तिची जीवन कथा चरित्रात मांडलेली असते.



'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (GIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Issue 114 (B) - Recent Trends in Research
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

एकंदरीतच चरित्र म्हणजे एखाद्या विशिष्ट व्यक्तिजीवनातील विविध घटनांची क्रमिकेने व कालात्मकतेने नोंद करीत असताना त्या आधारातून त्या व्यक्तिजीवनाची घडण व्यक्तिमत्त्वाची नवनिर्मिती यांचाच्या लेखनातून घडीव मांडला येईल.चरित्र या संकल्पनेच्या संदर्भात विचार करताना ते शास्त्र ही आहे आणि कलाही आहे, त्यात इतिहासही असले आणि साहित्यही असले.त्यामुळेच चरित्र शास्त्र व कला यांच्या सीमारेषेवरचा हा साहित्यप्रकार आहे,असेही मत मांडले आहे.एका साहित्यप्रकार म्हणूनही त्याचा विचार केला आहे.म्हणून चरित्र या संकल्पनेचा साहित्यप्रकाराच्या अनुषंगाने विचार करणे क्रमप्राप्त आहे.चरित्र एक साहित्यप्रकार व त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**चरित्र,एक वाङ्मयप्रकार:–**

मराठी साहित्यामध्ये 'कथा,कादंबरी,काव्य,नाटक' हे महत्त्वाचे वाङ्मयप्रकार मानले गेले.परंतु चरित्र–आत्मचरित्र हे साहित्याचे प्रकार आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला गेला. अभ्यासकांमध्ये मतभिन्नता आढळते. चरित्र हे शास्त्र आहे की कला यासंदर्भात अनेक मान्यवर अभ्यासकांनी आपली मते मांडली आहेत. त्यामध्ये अनंत टिकेकार यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे.ते म्हणतात,''चरित्रलेखन ही कला (आर्ट्स) आहे की ते शास्त्र(सायन्स) आहे,असा प्रश्न वेळोवेळी उपस्थित केला जातो या प्रश्नाचे उत्तर दोन्हीही देता आहे.चरित्र लेखन हे शास्त्र तर आहेच पण ती कलाही आहे दोहोंचा समसमान महत्त्व आहे असेही जीवन चरित्रात तसे तर सांगता येत नाही.चरित्राला या आत्मचरित्राला शास्त्रसंज्ञा,पृथक्करणाचा यांच्या सर्वांना पद्धतशास्त्र पद्धतीसंज्ञा आपुरुपातील प्रत्येक घटना प्रसंगाचा तपशील देता येत नाही.मग आवश्यकतेनुसार निवड आली ही कला आलीच. पद्धतीचे प्रसंग किंवा आकर्षक या वाचनीय पद्धतीने सामोरची पोणाऱ्या वाचेल सामोरची हे उत्तमाचे पर जोडी घेतला लेखकी आले.चरित्रकार तर दुसऱ्याचे जीवन सांगत असतो त्याला चरित्रनायकाचे जीवन किती ज्ञात होऊ शकलेले चरित्रनायकाच्या मनात किती शोकवला वैशाह,याला मर्यादा आहेत.''

टिकेकारांनी शास्त्र आणि कला या दोन्ही घटकांना चरित्रसंदर्भात महत्त्व दिलेले आहे.ते योग्यच आहे. कारण चरित्र हा व्यक्तिचा इतिहास असतो.त्याला शास्त्र येते परंतु घटना,प्रसंग,भाषा या घटकांच्या संदर्भात विचार केला तर त्यात कलाही आली म्हणून टिकेकारांचे म्हणणे परस्परसापेक्ष आहे असे जरी असले तरी चरित्र हा कलात्मकरित्या आहे हे मुख्य गृहीतकाने मान्य करावे लागते.त्यानुसारच चरित्राचा विचार करावा लागतो.

चरित्राच्या संदर्भात सदा कऱ्हाडे यांनी मांडलेली भूमिकाही लक्षात घेण्यासारखी आहे.''चरित्र हा मुख्यतः स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे असे नाही तर ललित वाङ्मय व ललितेतर वाङ्मय यामध्ये सीमारेषेवरचा असणारा हा वाङ्मयप्रकार आहे.'' म्हणजेच सदा कऱ्हाडे हे चरित्राला वाङ्मयप्रकार आहे मानत नसतात.व त्यासंदर्भात आपले मराठी साहित्यात ''चरित्रातील इतिहासातून व्यक्तिविशिष्टत्वाच्या प्रकट होत असणे. व्यक्तिविशिष्टत्वाच्या उपलब्धीकरणाला जेवढा अनुरूप असलेली,निवेदनाची,भाषाशैलीची,जिवेनजाणीवेची जोड लाभते तेवढ्या चरित्राला

हुबेहूब चित्र निर्माण करण्याचा आहे."

अशा प्रकारे चरित्र ही व्यक्तिजीवनाची पुनर्निर्मिती असल्यामुळे सत्यकथनाबरोबरच त्यात वेगवेगळ्या व्यक्ती,घटना प्रसंग यांचे चित्रण,मानवी मूल्यांप्रमाणे दर्शन,आशयानुसारिनिर्मिती यांसारख्या विविध वैशिष्ट्यांमुळे चरित्र ही साहित्यकृती लक्षणीयपूर्ण बनते यात संशय होत नाही.म्हणून असा या चरित्रवाङ्मयाला साहित्यप्रकार मानणे उचित ठरते. चरित्राचे स्वरूप नेमके कसे आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे. आणि म्हणून चरित्रवाङ्मयाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**चरित्र साहित्यप्रकाराचे स्वरूप:-**

चरित्र या साहित्यप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न आजवर अनेक अभ्यासकांनी केला आहे.त्यांनी चरित्र या साहित्यप्रकाराच्या व्याख्या विविध रीते मांडलेली आहेत.त्या व्याख्यांचा विचार करून स्वरूप स्पष्ट करता येईल.म्हणून काही मान्यवर अभ्यासकांच्या चरित्र या साहित्यप्रकारासंबंधीच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) अ.ना.जोशी–"सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तिदर्शन हेच चरित्राचे स्वरूप आहे."

२) मंदा कऱ्हाडे–"चरित्र म्हणजे एखाद्या विशिष्ट कालखंडातील इतिहासाने निर्माण केलेल्या एखाद्या व्यक्तिचे घडविलेले वैयक्तिक जीवनदर्शन,व्यक्तिमत्त्वदर्शन,व्यक्तिमनोदर्शन यांचेतिहासाच्या पार्श्वभूमीवर घडविलेले स्वतंत्र कर्तृत्वदर्शन."

३) द.ग.गोखले–"चरित्र म्हणजे एका माणसाचा किंवा अनेकांचा वृत्तांत सांगणारी कलाकृती."

४) जयंत बर्वे–"चरित्र एका व्यक्तिच्या जीवनाचा वा जीवनखंडाचा कालक्रमानुसार वृत्तांत कलात्मकतेने रेखाटून ते व्यक्तिमत्त्व उलगडण्याचा प्रयत्न चरित्रकार करतो व हा वृत्तांत सत्य,वास्तव आणि प्रत्यक्ष घटनांवर वा उपलब्ध पुराव्यांवर आधारलेला असतो."

५) शांताबाई मंत्र–"एका व्यक्तिच्या जीवनात घडलेल्या घटनांचा वृत्तांत म्हणजेच चरित्र होय.याचाच अर्थ 'चरित्र' म्हणजे व्यक्तिच्या आत्मिक,विकासाचा इतिहास होय."

६) डॉ. मोहिनी कटू–" एखादया व्यक्तिच्या जीवनेतिहासातील महत्त्वपूर्ण व वेधक घटनांची विशिष्ट हेतूने व कलात्मकतेने केलेली यथातथ्य मांडणी म्हणजे चरित्र होय."

वरील सर्व अभ्यासकांच्या चरित्राच्या व्याख्यांचा विचार केल्यास असे स्पष्ट होते की, मनुष्य हा चरित्राचा केंद्रबिंदू आहे आणि म्हणून चरित्रात व्यक्तिच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत च्या घटनांचा क्रमवार ,इतिहास या दृष्टीत येतो.त्याचबरोबर त्या व्यक्तिच्या वैयक्तिक सार्वजनिक आयुष्यकालील कार्य ,विविध घटनाप्रसंगातून व्यक्तीतली तिची क्रिया प्रतिक्रियात्मक वृत्ती–प्रवृत्ती त्याचबरोबर व्यक्तिची स्वभावविशेषांची यांचे विश्लेषण येते. आणि हे सर्व चरित्रकाराला समजलेल्या सत्याच्या साहाय्याने स्वतंत्र कलात्मकतेने रेखाटलेले असते.

चरित्र हे सत्य व कलात्मक असले पाहिजे हे अ.ना.जोशी यांचे मत योग्यच आहे, कारण चरित्रात जे घडले आहे तेच सांगितले गेले पाहिजे.त्यामुळे चरित्रात सत्य गोष्टीला अधिक महत्त्व आहे.



'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Issue 114 (B) - Recent Trends in Research
UGC Approved Journal
ISSN: 2348-7143
January-2019

चरित्रामध्ये व्यक्तिच्या जीवनातील ऐतिहासिक पार्श्वभूमीवर घडविलेले कर्तृत्वदर्शन मुख्य महत्त्वाचे असते,असे मत मंदा कऱ्हाडे यांनी मांडले आहे.परंतु त्यांनी चरित्रातील घटनांची निवड करण्याचे सूचित केले नाही.चरित्रामध्ये व्यक्तिच्या संपूर्ण आयुष्याचा जीवनपट मांडणे शक्य नसते म्हणून घटनांची निवड करणे क्रमप्राप्त ठरते.त्यानुसार चरित्रात कलात्मकता प्राप्त होत असते.

अ.ना.जोशी चरित्र हा वाङ्मयप्रकाराला भाग मानतात तर मंदा कऱ्हाडे चरित्र ही इतिहासग्रंथ पण वाङ्मयातीलच एक शाखा मानतात.त्याचबरोबर द.ग.गोखले हे एका व्यक्तिच्या जीवनाचा वा जीवनखंडाचा वृत्तांत सांगणारी कलाकृती मानतात.तर जयंत बर्वे त्या व्यक्तिच्या जीवनखंडाचा कालानुसार वृत्तांत कलात्मकतेने रेखाटलेला व हा वृत्तांत सत्य,वास्तव व प्रत्यक्ष संशोधनावर आधारित असतो.त्याला चरित्र मानतात.या सगळ्यांच्या दृष्टिने चरित्र ही एक कलात्मक कृती आहे.म्हणजेच तो साहित्याचा महत्त्वाचा प्रकार आहे असे म्हणता येईल.

थोडक्यात चरित्र हे विशिष्ट व्यक्तिच्या जीवनाचा वृत्तांत मांडत असते.ते मांडत असताना त्यात कालक्रमाला आवश्यक असतो.चरित्रात व्यक्तिच्या जीवनाचा पट जन्मापासून ते मृत्यूपर्यंत मांडणे अपरिहार्य असते.असे जरी असले तरी त्यात योग्य त्या घटनांची निवड करणे लिहिणाऱ्या लेखकाचे असते.व्यक्तिचा संपूर्ण जीवनपट मांडणे व्यवहारीक दृष्टिकोणे शक्यदायक नसते.त्यामुळे काही मर्यादा पडत असतात त्यामुळे चरित्रकाराला योग्य त्या घटनांची निवड करावी लागते. हे करत असताना सत्य व वास्तव जीवन मांडणे हा चरित्राचा महत्त्वाचा भाग आहे.चरित्र लेखनामागे व्यक्तिच्या जीवनानुक्रमालाही प्राधान्य देणे गरजेचे असते.त्याबरोबर चरित्रकाराने चरित्र नायक ही व्यक्ती केवळ आदर्श या दृष्टिकोणातून चित्रण न करता एक माणूस म्हणून कशी असेल याचा सुध्दा विचार करणे आवश्यक असते.म्हणजेच चरित्रकाराने चरित्रनायकाबद्दल कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता व्यक्तीचे गुणदोष मांडावेत तरच चरित्र यथार्थ ठरू शकते.

**चरित्र साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये:-**

चरित्र या साहित्यप्रकाराची संकल्पना,स्वरूप पाहिल्यानंतर त्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) विशिष्ट व्यक्तिचे जीवनदर्शन हे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

२) वस्तुनिष्ठता

३) सत्य व वास्तव जीवन चित्रित करणे.

४) कलात्मकता

**समारोप:-**

चरित्र हा इतिहासाचा भाग असून तो वाङ्मयाचा प्रकार आहे.कारण चरित्रात व्यक्तिविषयक

क्षेत्रातील यशस्वी लोकांची चरित्रेही मोठया प्रमाणात लिहिली जात आहे.त्याचबरोबर स्त्रियांवरील चरित्रलेखनात वाढ होत आहे.

**संदर्भग्रंथ:–**


१. सदा कऱ्हाडे,चरित्र आणि आत्मचरित्र (साहित्यरूप),लोकवाङ्मयगृह प्रा.लि.जुलै१९७६ पृष्ठांक ५,६

२. अशोक केशवराव कोठावळे (संपा.)ललित,( चरित्रे/आत्मचरित्र विशेषांक),जून,जुलै२०१३ पृष्ठांक १४

३. सदा कऱ्हाडे, उनि. पृष्ठांक ७

४. तत्रैव,पृष्ठांक १०

५. द.न.गोखले, चरित्र –चिंतन,मौज प्रकाशन,२६ जानेवारी २००० पृष्ठांक ११

६. अ.म.जोशी, चरित्र – आत्मचरित्र:तंत्र आणि इतिहास, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे आवृत्ती जानेवारी २००७ पृष्ठांक २३

७. तत्रैव, पृष्ठांक २७

८. सदा कऱ्हाडे, उनि. पृष्ठांक १४

९. द.न.गोखले, उनि. पृष्ठांक ११

१०.जयंत वष्ट,मराठी चरित्र:रूप आणि इतिहास,पद्मागंधा प्रकाशन,ऑक्टोंबर२००९, पृष्ठांक १८

११.प्रा.जान्हवी संत, चरित्र–आत्मचरित्र,कोल्हापूर,१९७०, पृष्ठांक ५

१२.डॉ.मोहिनी कडू,भारतीय राजकारणातील स्त्रिया,विजय प्रकाशन,२००८ पृष्ठांक ४०